आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२१ मे २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- छत्तीसगडमधे झालेल्या चकमकीत बसव राजूसह २७ माओवादी ठार, एक जवान शहीद

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताची बाजू जगभरात मांडण्यासाठी शिष्टमंडळं रवाना व्हायला सुरुवात

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या १०३ अमृत भारत रेल्वेस्थानकांचं उद्घाटन, महाराष्ट्रातल्या १५ स्थानकांचा समावेश

- ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**आणि**

- केरळमध्ये येत्या तीन-चार दिवसात मान्सून पोचण्याची शक्यता /महाराष्ट्र, केरळ, गोवा, कर्नाटकात पुढचे पाच ते सहा दिवस जोरदार पावसाचा अंदाज

**<><><><><>**

छत्तीसगडच्या नारायणपूर, विजापूर आणि दंतेवाडा भागात सुरक्षादलांशी ५० तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या चकमकीत २७ माओवादी ठार झाले. यात कुख्यात माओवादी आणि सीपीआय-माओइस्टचा सरचिटणीस नंबाला केशव राव उर्फ बसव राजू याचाही समावेश आहे. त्याच्यावर एक कोटी रुपयांचं बक्षीस होतं. या कारवाईदरम्यान सशस्त्र दलाचा एक जवान शहीद झाला. सुरक्षादलांनी या ठिकाणावरून मोठा शस्त्रसाठा आणि इतर साहित्य जप्त केलं आहे. या भागात शोधमोहीम अद्याप सुरू आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कारवाईचं कौतुक केलं असून माओवादाचं समूळ उच्चाटन करायला सरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ही

कारवाई म्हणजे माओवादाचा नायनाट करण्याच्या लढाईतलं महत्त्वाचं पाऊल आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरची माहिती सर्व देशांना देण्यासाठी आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद जगासमोर आणण्यासाठी भारतानं आखलेल्या धोरणांतर्गत संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालचं सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झालं. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल.

शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळही आज रवाना होणार आहे. हे शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिराती, काँगो, लायबेरिया आणि सिएरा लिओन या देशांना भेट देईल.

या धोरणांतर्गत एकूण सात सर्वपक्षीय शिष्टमंडळं ५ जूनपर्यंत ३२ देशांना भेट देऊन भारताची भूमिका समजावून सांगणार आहेत.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्तानं ऑपरेशन सिंदूरचं यश अधोरेखित करण्यासाठी **नागपूर शहर काँग्रेसनं** तिरंगा यात्रा काढली.

**लातूर, वाशीम**, **रायगड जिल्ह्यात** आज तिरंगा यात्रा काढण्यात आल्या. **नाशिक जिल्ह्यातही** तिरंगा यात्रा काढण्यात आली. त्यावेळी माजी सैनिक विजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली…

**होल्ड… विजय शिरसाट माजी सैनिक बाईट (१९ सेकंद)**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राजस्थानातल्या बिकानेर इथून देशातल्या १०३ अमृत भारत रेल्वेस्थानकांचं उद्घाटन करणार आहेत. अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत या रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास करण्यात आला असून स्थानिक संस्कृती आणि वारसा अधोरेखित करणारी सजावट इथं केली आहे. यात महाराष्ट्रातल्या १५, तर मुंबईतल्या चिंचपोकळी, परळ, वडाळा रोड आणि माटुंगा या चार स्थानकांचा समावेश आहे. १५ महिन्यांच्या कालावधीत ७१ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्चून या स्थानकांचा पुनर्विकास केला आहे.

<><><><>

आशियाई उत्पादकता संस्थेचं २०२५-२६साठीचं अध्यक्षपद भारतानं आज या औपचारिकरीत्या स्वीकारलं. अध्यक्षतेच्या काळात संस्थेच्या २०३०साठीच्या उद्दिष्टांची पूर्तता आणि हरित उत्पादकतेच्या दुसऱ्या टप्प्याच्या आखणीचा परीघ वाढवण्यावर भारताचा भर असेल. आशियाई उत्पादकता संस्था ही टोक्यो स्थित संस्था आशिया-प्रशांत क्षेत्रातली उत्पादकता वाढवण्यासाठी विविध २१ देशांच्या सरकारांसोबत काम करते. भारत या संस्थेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक असून सुरुवातीपासून संस्थेच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी भरीव योगदान देतो आहे.

<><><><>

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्यावर आज पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी बंदुकांच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली. आज सकाळी त्यांचं पार्थिव आयुका इथं अंत्यदर्शनासाठी ठेवलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासह इतर मान्यवरांनी डॉ. नारळीकरांचं अंत्यदर्शन घेतलं.

<><><><>

यंदा मान्सूनचं आगमन वेळेआधीच होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. केरळमधे १ जूनला मान्सून पोचतो, मात्र यावेळी तो पाच दिवस आधीच म्हणजे येत्या तीन ते चार दिवसात पोचण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, असं हवामान विभागाचं शास्त्रज्ञ नरेश कुमार यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. त्यानंतर तीन ते चार दिवसात तो बंगाल आणि ईशान्येकडे सरकेल, असं ते म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्र, केरळ, गोवा, आणि कर्नाटक किनारपट्टीवर जोरदार पाऊस सुरु असून पुढचे पाच ते सहा दिवस अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. तर, राजस्थानात पुढचे तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पंजाब, हरयाणा, चंदीगढ, आणि पूर्व राजस्थानातही पुढचे दोन दिवस उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईच्या वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांचा सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या सात षटकात ३ बाद ६३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक नवं प्रारूप तयार करण्यासाठी संपूर्ण जग भारताकडे आशेने बघत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केलं. एका खासगी वृत्तवाहिनीशी ते बोलत होते. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र अधिक सुरक्षित करण्याच्या दृष्टीनं पथकं तयार केल्याची माहिती त्यांनी दिली. एआय मिशनचं काम उत्तम सुरू असून क्षमता, वापर आणि प्रतिभा या तिन्ही क्षेत्रांमध्ये जगातल्या सर्वोत्तम पाच

एआय देशांमध्ये टिकून राहण्याचं भारताचं ध्येय असल्याचंही वैष्णव यांनी नमूद केलं.

**<><><><>**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रातांत खुजदार शहरात आज एका शाळेच्या बसवर झालेल्या बॉम्ब हल्ल्यात तीन मुलांसह पाच जणांचा मृत्यू झाला. तर अनेक जण जखमी झाले. खुजदार शहराबाहेर या बसमधे स्फोट झाला त्यावेळी त्यात सुमारे ४० विद्यार्थी होते. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही संघटनेनं घेतलेली नाही.

या हल्ल्यामागे भारताचा हात असल्याचा आरोप पाकिस्ताननं केला आहे. तो भारतानं फेटाळून लावलाय. पाकिस्तानात घडलेल्या अंतर्गत गोष्टींसाठी भारताला जबाबदार धरण्याची त्यांना सवय आहे, दहशतवादाला खतपाणी घालणारा देश ही प्रतिमा, आणि स्वतःचं अपयश लपवायचा हा प्रयत्न आहे, असी टीका परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी बातमीदारांशी बोलताना केली.

**<><><><>**

कन्नड लेखिका, वकील आणि सामाजिक कार्यकर्त्या बानू मुश्ताक यांनी लिहिलेल्या आणि दीपा भस्थी यांनी इंग्लिशमध्ये अनुवादीत केलेल्या 'हार्ट लॅम्प' या कथासंग्रहाला प्रतिष्ठेचा बुकर पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारावर नाव कोरणारा हा पहिलाच कथासंग्रह आणि पहिलीच मूळ कन्नड साहित्यकृती आहे. तसंच दीपा भस्थी या बुकर पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्याच भारतीय अनुवादक आहेत. दक्षिण भारतातल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेचा सामना करणाऱ्या महिला आणि मुलींची व्यथा मांडणाऱ्या १२ कथा या संग्रहात आहेत.

**<><><><>**

देशातल्या आठ प्रमुख उद्योगांचा एकत्रित निर्देशांक चालू वर्षात एप्रिल महिन्यात अर्ध्या टक्क्यानं वाढल्याचं दिसून आलं आहे. कोळसा, नैसर्गिक वायू,

पोलाद, सिमेंट आणि ऊर्जा हे ते पाच प्रमुख उद्योग असून, सिमेंट उद्योगात ६ पूर्णांक ७ दशांश, कोळसा उद्योगात ३ पूर्णांक ५ दशांश, तर पोलाद उद्योगात ३ टक्के वाढ झाली. ऊर्जा निर्मितीत एक टक्के, तर नैसर्गिक वायू निर्मितीत चार दशांश टक्के वाढ झाली असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**